International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 Sept-Oct 2023

# बहुभाषावाद: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

**डॉ. अपर्णा राहूल उकले**
सहयोगी प्राध्यापक, ज्ञानगंगा कॉलेज ऑफ एज्युकेशन, हिंगणे खुर्द, पुणे
Corresponding Author – डॉ. अपर्णा राहूल उकले
DOI- 10.5281/zenodo.10156213

**प्रस्तावना:**

प्रत्येक बालक आपल्या आजूबाजूच्या परिसरातून अनेक गोष्टी शिकत असते. कुटुंबातून त्याची शिक्षणाला सुरुवात होते. अनुकरणातून मुलं आपली मातृभाषा शिकतात. घरातील व्यक्तींचे शब्द त्यांच्या कानावर पडून ते मूल बोलायला लागते. म्हणजेच ते आपली भाषा शिकते. कारण भाषा आहे आपले विचार व्यक्त करण्याचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. भाषेच्या सहाय्याने मुल अनेक कामे करू शकतात. भाषा हे केवळ गरजा व्यक्त करण्याचे साधन नसते, तर ते अनंत मानवी व्यवहारांसाठी परस्पर संपर्काचे साधन असते. भाषा अभिव्यक्तीचे साधन असते. तसेच ते विचार व्यक्त करण्याचे व विचार करण्याचे साधन असते. व्यंगोटस्की यांनी भाषा आणि विचार यामधील परस्पर संबंध मांडण्याचे महत्त्वाचे कार्य केलेले आहे. प्रत्येक बालकांमध्ये आपले विचार व्यक्त करण्याची क्षमता विकसित होत जाते. वयाच्या दुसऱ्या वर्षापर्यंत ही क्षमता विकसित होत जाते. मानवी जाणिवांच्या निर्मितीसाठी आणि वृद्धीसाठी भाषा आणि विचार यांचा संयोग महत्त्वाचा आहे. म्हणूनच शब्दही एक प्रभावी शक्ती आहे असे व्यंगोटस्की म्हणतात. म्हणूनच मुलांचे पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषेतूनच असावे असे त्यांनी सुचविले आहे. कारण भाषा शिक्षण हा शिक्षणाचा मूलभूत गाभा आहे. तसेच भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे. मातृभाषेतून मुलांना किमान प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे हे तत्त्व सर्व जगभर मान्य झालेले आहे. कारण लहान मूल हे कोणत्याही प्रकारचे ज्ञान हे परक्या भाषेपेक्षा आपल्या मातृभाषेतून सहजपणे आकलन करू शकते. म्हणूनच सुरुवातीपासून शिक्षणाचे कोणतेही धोरण ठरविताना मातृभाषेला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे,

**मातृभाषा शिक्षणाची पार्श्वभूमी:**

राधाकृष्णन आयोग (1948-49) या आयोगाने मातृभाषेचा दर्जा वाढविणे हे एक उद्दिष्ट आपल्यासमोर ठेवले होते. कारण मातृभाषेला शिक्षणात अनन्यसाधारण महत्त्व आहे. मातृभाषेतून घेतलेले शिक्षण समजण्यास सोपे जाते. विषयाचे आकलन होते. म्हणूनच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे अशी शिफारस राधाकृष्णन आयोगाने केलेली आहे. भारतीय शिक्षण आयोग किंवा कोठारी शिक्षण आयोग (1964-66) या आयोगाने शिक्षणाच्या माध्यमातून शिफारस केलेली आहे. जी भाषा ज्या प्रदेशात बोलली जाते तीच भाषा त्यांची मातृभाषा असते. म्हणून प्रादेशिक भाषा हेच शिक्षणाचे माध्यम ठेवावे. पदवी पूर्व अध्यापन प्रादेशिक भाषेतून आणि नंतरचे अध्यापन इंग्रजी माध्यमातून घ्यावे लागेल असे भारतीय शिक्षण आयोगाने सुचविले आहे. कारण या धोरणामध्ये राष्ट्रीय एकात्मता, भाषिक अस्मिता आणि देशाची बहुभाषिकता लक्षात घेऊन सर्वप्रथम त्रैभाषिक भाषा धोरण स्वीकारण्यात आले आहे. भारतामध्ये तमिळनाडू हे राज्य सोडून इतर सर्व राज्यांनी या त्रैभाषिक धोरणाचा स्वीकार केलेला आहे. तमिळनाडू ने तमिळ व इंग्लिश असे द्विभाषिक धोरण स्वीकारले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (1986) या आयोगाने हे शिक्षणाच्या सर्व स्तरावर प्रादेशिक भाषेचा किंवा मातृभाषेचा वापर माध्यम म्हणून होणे आवश्यक आहे असे सुचविले आहे. कारण शिक्षणात इंग्रजीचा वापर भाषेचे माध्यम म्हणून होत असल्याने ग्रामीण विद्यार्थ्यांच्या विकासात ते एक अडसर बनले आहे, असा राममूर्ती समितीचा निष्कर्ष आहे. म्हणूनच प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत मातृभाषेतूनच किंवा प्रादेशिक भाषेतूनच शिक्षण दिले पाहिजे. तसेच विद्यापीठ परीक्षेमध्ये सुद्धा पर्यायी व्यवस्था म्हणून प्रादेशिक भाषा माध्यम म्हणून वापरावी असे या आयोगाने सुचविले आहे. सध्याच्या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये (2020) विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देणे, भारताला जागतिक महासत्ता

बनवणे या दृष्टिकोनातून नवीन शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत. त्यामध्ये शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व इतर क्षेत्रातील क्षमता विकसित करण्यासाठी मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषांना प्राधान्य द्यावे असे सुचविले आहे. तसेच अध्ययन अध्यापनामध्ये बहुभाषिकता आणि भाषा शक्ती यांना महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निवडणे व त्याचे माध्यम निवडण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. संपूर्ण शिक्षणामध्ये लवचिकता ठेवलेली आहे. हे धोरण ग्रामीण व शहरी भागातील प्राथमिक शिक्षण ते उच्च तसेच व्यावसायिक प्रशिक्षणासाठी एक व्यापक आराखडा आहे. या धोरणामध्ये कोणावरही कोणत्याही विशिष्ट भाषेचा अभ्यास करण्यास भाग पाडले जाणार नाही. या नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये शिक्षणाच्या आकृतीबंधामध्ये बदल केलेला आहे. 3 ते 18 या वयोगटाला समाविष्ट करणारी अशी 5+3+3+4 शैक्षणिक रचना केलेली आहे ती पुढील प्रमाणे आहे.

पहिला स्तर हा पायाभूत स्तर आहे. या स्तरांमध्ये 3 ते 8 या वयोगटातील मुलांचा समावेश असणार आहे. त्यामध्ये अंगणवाडी किंवा पूर्व प्राथमिक शाळेची तीन वर्षे व प्राथमिक शाळेची इयत्ता पहिली व दुसरी अशी दोन वर्षे असणार आहेत. पूर्व अध्ययन स्तरांमध्ये 8 ते 11 वयोगटातील मुलांचा समावेश असणार आहे. यामध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी अशी तीन वर्षे असणार आहेत. पूर्व माध्यमिक स्तरावर 11 ते 14 वयोगटातील मुलांचा समावेश असणार आहे. या स्तरांमध्ये सहावी ते आठवी अशा इयत्तांचा समावेश असणार आहे. माध्यमिक स्तर 14 ते 18 या वयोगटातील मुलांचा समावेश असेल. तसेच या स्तरांमध्ये नववी ते बारावी या इयत्तांचा समावेश असणार आहे. वरील सर्व स्तरावरील इयत्तांमध्ये विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेतूनच शिक्षण देणे का महत्त्वाचे आहे ते पुढील मुद्द्यावरून स्पष्ट होते.

**मातृभाषेतून पूर्व अध्ययन स्तराचे शिक्षण:**

पायाभूत स्तरांमध्ये विद्यार्थ्यांना घरामध्ये बोलली जाणारी भाषा किंवा मातृभाषा किंवा स्थानिक भाषेतून शिक्षणाची सुरुवात झाली पाहिजे. लहान मुलांना सुरुवातीला मातृभाषेतून विविध गोष्टी, कथा, शब्द, विविध खेळ, गाणी, अंक इत्यादी गोष्टी शिकवाव्यात. मग हळूहळू विविध विषयांच्या शिक्षणाची सुरुवात करावी. कारण लहान मुलांना मातृभाषेतून विविध विषय शिकविणे सोपे जाते. तसेच विषयातील अवघड संकल्पना लवकर समजतात. तसेच संशोधनातून असे करण्यात आले आहे की. 2 ते 8 या वयोगटातील मुले भाषा अतिशय लवकर शिकतात. म्हणून या वयोगटातील मुलांना विविध भाषा शिकविणे आवश्यक आहे. कारण या वयातील मुलांना बहुभाषिकत्त्वाचा फायदा आकलनासाठी होतो. म्हणूनच पायाभूत स्तरापासूनच लहान मुलांना विविध भाषांची ओळख करून दिली पाहिजे. त्यामध्ये सर्वप्रथम मातृभाषेपासून सुरुवात होणे आवश्यक आहे. सर्व भाषा आनंददायक वातावरणात व संवाद आणि शिकवल्या जाव्यात. सुरुवातीला मातृभाषेतील वाचन व लेखन शिकवावे. त्यानंतर इतर भाषेतील वाचन व लेखनाकडे लक्ष द्यावे. तसेच पायाभूत स्तरावर विविध खेळांच्या व कृतीच्या माध्यमातून शिक्षण दिले जावे. विद्यार्थ्यांशी सतत संवाद साधून आणि त्यांच्या संभाषण कौशल्यावर भर देऊन भाषेचे शिक्षण द्यावे. तसेच पूर्वाध्ययन आणि पूर्व प्राथमिक शाळेच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत विद्यार्थ्यांनी वाचणे, बोलणे, लिहिणे, मोजणे यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. त्यासाठी भाषा शिक्षक किंवा स्थानिक भाषा येत असलेले शिक्षकांची नेमणूक केली जाईल. पायाभूत शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले तरच विद्यार्थ्यांमध्ये वरील क्षमता विकसित होईल. त्यासाठी किमान पाचव्या इयत्तेपर्यंत व शक्यतोवर आठवा इयत्तेपर्यंत मातृभाषेतूनच शिक्षण दिले पाहिजे. या गोष्टींचे पालन करणे सर्व सरकारी व खाजगी शाळांना बंधनकारक असेल. त्यासाठी शाळेतील सर्व विषयांची पुस्तके मातृभाषेतून उपलब्ध करून दिले जातील. म्हणजेच बालकाकडून घरात बोलली जाणारी भाषा व शिक्षणाचे माध्यम या तफावत राहणार नाही. ज्या मुलांची मातृभाषा आणि शिक्षणाचे माध्यम या तफावत असेल तेथे शिक्षकांना द्विभाषा पद्धत वापरण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

**त्रैभाषिक धोरणांची अंमलबजावणी सुरूच राहणार:**

पूर्वीच्या धोरणात सांगितल्याप्रमाणे या नवीन शैक्षणिक धोरणातही त्रिभाषा सूत्रांची अंमलबजावणी सुरूच राहणार आहे. मात्र नवीन धोरणातील त्रिभाषा सुत्रामध्ये अधिक लवचिकता असेल. तसेच कोणत्याही राज्यावर कोणतीही भाषा लागली जाणार नाही. मुलांना ज्या तीन भाषा शिकायच्या आहेत त्यामध्ये किमान दोन भाषा या भारतीय असतील. या भाषांची निवड ते राज्य, प्रदेश अर्थातच विद्यार्थी करतील. ज्या तीन भाषा विद्यार्थी शिकत असतील त्यापैकी एक किंवा दोन भाषा बदलून नवीन दुसरी भाषा शिकण्याची विद्यार्थ्यांना परवानगी आहे. इयत्ता

सहावी किंवा सातवीच्या वर्षाच्या शेवटी ते त्यांना हवी ती भाषा निवडू शकतात. मात्र विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तराच्या शेवटी या तीन भाषांमध्ये विशेष प्राविण्य मिळविणे बंधनकारक असेल.

**त्रैभाषिक धोरणात संस्कृत भाषेचा समावेश:**

संस्कृत भाषा शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर व उच्च शिक्षणात एक महत्त्वाचा पर्याय म्हणून उपलब्ध केला आहे. तसेच त्रिभाषा सूत्रातही एक महत्त्वाचा पर्याय म्हणून संस्कृत भाषेचा समावेश केलेला आहे. कारण संस्कृत भाषा ही भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचित एक महत्त्वाची आधुनिक भाषा म्हणून नमूद केलेली आहे. तसेच संस्कृती भारतातील महत्त्वाची अभिजात भाषा आहे. संस्कृत भाषेत हजारो वर्षाच्या काळात लिहिलेल्या गणित, व्याकरण, तत्त्वज्ञान, राजकारण, वैद्यकशास्त्र, काव्य, कथाकथन, नाटक आणि इतर गोष्टींचा खजिना म्हणजेच भारतीय साहित्य उपलब्ध आहे. त्यामुळे या भारतीय साहित्याचे ज्ञान आणि सौंदर्य हे विद्यार्थ्यांना समजणे आवश्यक आहे. संस्कृत भाषा शिकविण्यासाठी पायाभूत व पूर्व माध्यमिक स्तरावरील संस्कृत पाठ्यपुस्तके ही सोप्या व रंजक पद्धतीने संस्कृत भाषेत लिहिली जातील. त्यामुळे विद्यार्थ्यांना संस्कृत भाषा शिकणे व तिचा अभ्यास करणे मनापासून आवडेल. तसेच संस्कृत ज्ञान प्रणालीच्या वापराद्वारे म्हणजेच त्यातील उच्चारण शास्त्र व उच्चारण याद्वारे विद्यार्थ्यांना संस्कृत भाषा व त्यातील साहित्याचा अभ्यास करण्याची संधी मिळेल म्हणून त्रैभाषिक धोरणात संस्कृत भाषेचा समावेश केलेला आहे.

**4.इतर अभिजात भाषांचा समावेश:**

भारतामध्ये संस्कृत सोबत इतरही अभिजात भाषा आहेत. त्यामध्ये तमिळ, तेलगू, मल्याळम, ओडिया आणि इतर भाषांचा समावेश होतो. भारतामध्ये इतरही भाषेत विपुल साहित्य उपलब्ध आहे. भारतातील भावी पिढीला इतर भाषेतील साहित्याची ओळख करून दिली पाहिजे. त्या त्या भाषेतील साहित्याचे संवर्धनही झाले पाहिजे. म्हणूनच शिक्षणामध्ये या इतर अभिजात भाषांचाही समावेश केलेला आहे. कारण विद्यार्थ्यांना व्यापक आणि सुंदर अभिजात साहित्याचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेबरोबरच पाली, पार्शियन आणि प्राकृत भाषा व इतर अभिजात भाषा आणि साहित्य अभ्यासण्याची संधी मिळेल, तसेच विद्यार्थ्यांना भारतीय भाषातील विविधता व एकता समजून घेण्याची संधी मिळेल. त्यासाठी ऑनलाईन मॉड्युलस ची निर्मिती करावी असे सुचविले आहे. की जेणेकरून या भाषांचा व त्यातील साहित्यांचा अभ्यास करणे विद्यार्थ्यांना सोपे व सुलभ होईल. हे मॉडेल्स नाविन्यपूर्ण व अनुभवात्मक मार्गाने तयार केले जातील. त्यामुळे या भाषा व त्यातील साहित्य हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होईल. तसेच सार्वजनिक व खाजगी शाळांमध्ये सहावी ते बारावी मधील सर्व विद्यार्थ्यांकडे किमान दोन वर्षाकरिता भारतातील पारंपरिक भाषा आणि त्यातील साहित्य अभ्यासण्याची संधी मिळेल. नाविन्यपूर्ण आणि तंत्रज्ञाना आधारित ज्ञानाची जोड देऊन विद्यार्थी पूर्व माध्यमिक स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत या विविध भाषांचा अभ्यास करू शकतील.

**5. आंतरराष्ट्रीय भाषा शिकण्याची संधी:**

पायाभूत स्तरापासून ते माध्यमिक स्तरापर्यंत विद्यार्थ्यांना मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा, इंग्रजी आणि भारतातील इतर अभिजात भाषा अभ्यासाची संधी मिळणार आहे. परंतु नवीन शैक्षणिक धोरणामध्ये नमूद केल्याप्रमाणे माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना परकीय भाषा शिकण्याची संधी देखील मिळणार आहे. त्यामध्ये जपानी, कोरियन, रशियन, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश इत्यादी सारख्या परकीय भाषांचा समावेश आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जगातील इतर संस्कृतीचा अभ्यास करता येणार आहे. भावी आयुष्यात त्यांना जगातील ज्ञानग्रहण करण्यासाठी व आपल्या अशा आकांक्षा वाढविण्यासाठी या परकीय भाषांची मदत होणार आहे.

**6. द्विभाषिक क्रमिक पुस्तकांची उपलब्धता:**

सर्व स्तरावरील अभ्यासक्रम व त्या त्या इयत्तांची पाठ्यपुस्तके ही इंग्रजी आणि मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेतून तयार केली जाणार आहेत. त्यामध्ये विज्ञान व गणित पुस्तकांसह सर्व विषयांचा समावेश असणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दोन्ही भाषेमध्ये आपल्या विषयांचा अभ्यास करता येणार आहे. तसेच विद्यार्थी दोन्ही भाषांमध्ये विचार करू लागतील. दोन्ही भाषेतून बोलण्यासाठी तो सक्षम होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेतून व इंग्रजी भाषेतून विविध विषयांचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. तसेच दोन्ही भाषेतून पाठ्यपुस्तके उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करणे सुलभ होईल.

**7.विविध भाषातून शैक्षणिक साहित्याची निर्मिती:**

पायाभूत स्तरापासून ते माध्यमिक स्तरापर्यंतच्या सर्व विषयाचे अध्यापन करत असताना शिक्षकांना विविध संकल्पना स्पष्ट करण्यासाठी, प्रत्यक्ष शैक्षणिक अनुभव देण्यासाठी विविध शैक्षणिक साहित्यांचा वापर करावा

लागतो. अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया मनोरंजक पद्धतीने होण्यासाठी, विद्यार्थ्यांचा वर्गामध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी शैक्षणिक साहित्याचा उपयोग होतो. त्यासाठी हे साहित्य मातृभाषा किंवा स्थानिक भाषेत व इंग्रजी भाषेमध्ये तयार केले जाणार आहे. प्रत्येक स्तरावर तयार केलेले हे शैक्षणिक साहित्य दीक्षा ॲप वर (डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर फॉर नॉलेज शेअरिंग) उपलब्ध करून दिले जाईल. यामध्ये आशयाला व विद्यार्थी वयोगटाला अनुसरून विविध चित्रे, तक्ते, शाब्दिक, खेळ, व्हिडिओ व ऑडिओ यांचा समावेश असेल. हे शैक्षणिक साहित्य तयार करत असताना शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांमध्ये भाषिक अडथळे दूर करण्यासाठी सर्व स्तरावर तांत्रिक व इतर मदत केली जाईल.

**8.भाषा तज्ञांची मदत :**

पायाभूत स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत भाषेचे अध्यापन करण्यासाठी त्या त्या भाषा शिक्षकांची नेमणूक केली जाणार आहे. तसेच विविध देशातील परकीय भाषा व इतर राज्यातील अभिजित भाषा शिकविण्यासाठी त्या भाषेमध्ये पारंगत असणाऱ्या विषय शिक्षकांची नेमणूक केली जाईल. विद्यार्थ्यांना विविध पातळयांवर भाषा शिकवण्यासाठी भाषिक पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, विविध ऑडिओ आणि व्हिडिओ, शब्दकोश, व्याकरण पुस्तिका आणि भाषिक खेळ इत्यादी सर्व प्रकारचे साहित्य तयार करण्यासाठी त्या त्या भाषेतील अनुभवी भाषा शिक्षक व भाषा तज्ञ आणि तंत्रज्ञ यांची मदत घेतली जाणार आहे.

**9.भाषिक विकासासाठी वाचनालयांची स्थापना:**

देशामध्ये वाचन संस्कृतीचा विस्तार करण्यासाठी शालेय व स्थानिक पातळीवर सार्वजनिक वाचनालय मोठ्या संख्येने सुरू केली जाणार आहेत. कारण देशांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व स्तरावरील विद्यार्थ्यां साठी मनोरंजक व प्रेरणादायी पुस्तके विकसित केली जातील. तयार केलेली पुस्तके स्थानिक व भारतीय भाषांमध्ये अनुवादित केली जातील. त्यासाठी भाषातज्ञ व तांत्रिक विभागाचे ही मदत घेतली जाईल. तयार केलेली पुस्तके शाळेमध्ये व सार्वजनिक वाचनालयामध्ये उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली जाईल. तसेच शालेय व सार्वजनिक ठिकाणी डिजिटल वाचनालय व बूक क्लबचे सुविधा उपलब्ध केली जाईल. देशांमध्ये सर्व ठिकाणी, सर्व भाषेचे, सर्व शैलीची व सर्व स्तरावरील पुस्तके उपलब्ध करून दिली जातील. वाचनातील गुणवत्ता, अभिरुची व सातत्य टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर उपक्रम हाती घेतला जाईल.

**10.शिक्षणाचे माध्यम निवडीचे स्वातंत्र्य:**

या धोरणामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाचे माध्यम निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. विद्यार्थी आपले शालेय जीवनातील शिक्षण उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षण हे आपल्या प्रादेशिक भाषेमधून किंवा मातृभाषेमधून पूर्ण करू शकतात. तसेच विद्यार्थ्यांना त्यांना जर हवे असेल तर ते इंग्रजी माध्यमातून देखील उच्च शिक्ष किंवा व्यावसायिक शिक्षण घेऊ शकतात. अभियांत्रिकी वैद्यकीय शिक्षण तसेच इतर व्यवसायिक शिक्षण देखील विद्यार्थी आपल्या प्रादेशिक किंवा मातृभाषेतून घेऊ शकतील. त्या दृष्टिकोनातून त्या सर्व अभ्यासक्रमाची पुस्तके इंग्रजी माध्यमासोबतच त्या त्या राज्यातील भाषेतून देखील तयार केली आहेत. की जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांना हव्या त्या माध्यमातून ते आपले शिक्षण पूर्ण करू शकतील. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना या नवीन धोरणामध्ये शिक्षणाचे माध्यम निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे.

**11. 'भारतातील भाषा' या उपक्रमात सहभागी होण्याची संधी:** भारतीय भाषा या जगातील सर्वात सुंदर आणि समृद्ध भाषांमध्ये घडल्या जातात. जगामध्ये सर्वांनी दाखवून दिले आहे की आपल्या भाषा या शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीसाठी खूप फायदेशीर व महत्त्वपूर्ण आहेत. कारण या भाषांमध्ये प्राचीन आणि आधुनिक साहित्यातील मोठा खजिना आहे. या सर्व भाषांमध्ये विपुल असे साहित्य उपलब्ध आहे. हे साहित्य विविध प्रकारांमध्ये आहे. जसे की गद्य, पद्य, नाटक, चित्रपट व संगीत इत्यादी. हे सर्व साहित्य आपल्या भारताचे राष्ट्रीय ओळख व संपत्ती आहे. या आपल्या साहित्याची जपवणूक करणे व पुढील पिढीला संक्रमित करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. त्यामध्ये विद्यार्थी विविध भाषेतील उच्चार, वर्ण लिपी, शब्द, त्यांची व्याकरण रचना शिकणार आहेत. तसेच विविध भाषेतील शब्दसंग्रह अभ्यासण्याची विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे. तसेच विविध भाषांचा एकमेकांशी असलेला संबंध, त्यांच्यातील सारखेपणा आणि फरक देखील अभ्यासता येणार आहे. तसेच भारतामध्ये भौगोलिक परिस्थितीनुसार कोणती भाषा बोलली जाते? त्यातील नेहमी वापरत असलेले शब्द व वाक्प्रचार कोणते? हे विद्यार्थ्यांना माहीत होणार आहे. तसेच त्या भाषेतील साहित्य वाचण्याची व अभ्यासण्याची संधी

मिळणार आहे. या उपक्रमाचे कोणतेही मूल्यमापन होणार नाही. त्यामुळे या उपक्रमात विद्यार्थी आनंदाने सहभागी होणार आहेत. आनंददायक वातावरणात व संवाद रूपाने विद्यार्थी भारतातील विविध भाषांचा व त्यातील साहित्य चा अभ्यास करणार आहे.

**12 . भाषा शिकवण्याची पद्धती:** प्राथमिक स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना विविध प्रकारे भाषा शिकविले जाईल. त्यासाठी विविध खेळ, उपक्रम, शब्दकोडी इत्यादींचा वापर केला जाईल. तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांसाठी वयोगटानुसार नवनवीन मॉडेल्स तयार केले जातील. विविध ॲपच्या मदतीने भाषिक संस्कृतीचे अध्यापन केले जाईल. तसेच विविध भाषेतील चित्रपट, नाटक, कथाकथन आणि संगीत यांच्याद्वारे विविध भाषेचा व त्यातील साहित्याचा अभ्यासकरण्याची संधी दिली जाईल. त्या त्या भाषेमध्ये उच्च शिक्षण प्राप्त केलेल्या शिक्षकांची नियुक्ती करून भाजी भाषेचे प्रमाणित ज्ञान दिले जाईल. भाषेचे शिक्षण हे अनुभवावर आधारित असेल. सर्व स्तरात तेल व सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय सांकेतिक भाषा देशभर प्रमाणित केली जाईल. त्यामध्ये श्रवण दुर्बलता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देशातील सर्व राज्यांमध्ये अभ्यासक्रम साहित्य विकसित केले जाईल. तसेच स्थानिक पातळीवरील सांकेतिक भाषेचा योग्य तेथे गरजेनुसार वापर केला जाईल. अशा प्रकारे प्राथमिक स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना विविध भाषा शिकण्याची संधी उपलब्ध करून दिले जाईल.

अशा प्रकारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये बहुभाषावादाचा स्वीकार केलेला आहे. त्यामध्ये पायाभूत स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत मातृभाषेला किंवा प्रादेशिक भाषेला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुरुवात ही मातृभाषेतूनच व्हावी असे सुचविले. आहे तसेच शिक्षणामध्ये त्रिभाषा स्वतःचाही स्वीकार केलेला. विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृत या भाषेसोबत इतरही अभिजात भाषा शिकण्याची संधी दिली जाणार. आहे तसेच इंग्रजी या आंतरराष्ट्रीय भाषेसोबत इतरही परदेशी भाषा शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. सर्व स्तरावरील सर्व विषयांचे पाठ्यपुस्तके ही मातृभाषा व इंग्रजी भाषेमध्ये तयार केली जाणार. आहेत तसेच विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्याची निर्मिती ही विविध भाषांमधून केली जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन करून असतील सर्व प्रकारचे साहित्य त्यांनी वाचावे म्हणून वाचनालय व उपलब्ध स्थापना आहे. अशाप्रकारे या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सर्व स्तरावर बहुभाषिकतेला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.

**संदर्भसूची**

1. National Education Policy 2020, Retrieved September, 2023, from https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf.
2. पानसे, र. (2005). बालशिक्षण: स्वरूप व नवी दिशा, पुणे,डायमंड
3. पेंडके, प्र. सु. (2005). भारतीय शिक्षण पद्धतीचा विकास, नागपूर, मंगेश
4. घोरमोडे, के. यु. आणि घोरमोडे, क. (2006). भारतीय प्रणालीचा विकास आणि शालेय व्यवहाराचे अधिष्ठान, नागपूर, विद्या
5. भोसले, र. अ. आणि डोणे, उ. म. (2009). शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, कोल्हापूर, फडके